# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/06/2021 (गुरूवार)

(सकाळ)

---

### पो.स्टे. रामटेक हद्दीत गांजा ची वाहतुक करणारे दोन इसमांना स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड........

दिनांक 23/06/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात गस्त करीत असता त्यांना गुप्त बातमीदारा कडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा येथुन दोन इसम हे पांढ–या रंगाचे ॲक्टीव्हा मोपेड दुचाकीने खिंडसी मार्गे रामटेक शहरात अंमली पदार्थ गांजा विकणे करीता घेवुन येणार आहेत. अशा माहीती वरूत पोलीस स्टेशन रामटेक परिसरात जगनाडे चौक जवळ दोन शासकीय पंचांसह नाकाबंदी लावुन त्यादरम्यान बातमीदाराने दिलेल्या वर्णनाप्रमाणे दोन इसम हे पांढ–या रंगाचे ॲक्टीव्हा मोपेड क्र. MH-36-AH-4595 या दुचाकीने येतांना दिसले. सदरचे दुचाकी वाहनास थांबवुन दुचाकी चालक 1) मनीष शंकरलाल चंद्रौल, वय 30 वर्ष, रा. बम्हणी (बंजर), जि. मंडला (म.प्र.) व त्याचे सोबत असलेला 2) इकबाल रमजान शेख, वय 35 वर्ष, रा. नैरपुर जि. मंडला (म.प्र.) अशा त्या दोन इसमांना ताब्यात घेवुन झडती मध्ये त्यांचे ताब्यातील होन्डा ॲक्टीव्हा मोपेड चे डीक्की मध्ये दोन खाकी रंगाचे बंडल मिळुन आले त्यामध्ये अंमली पदार्थ गांजा असल्याचे खात्री झाले वरून पंचांसमक्ष वजन काटयाने मोजमाप केले असता त्यामध्ये 2 किलो 19 ग्रॅम अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. सदर कारवाई दरम्यान मिळुन आलेला गांजा व मोपेड दुचाकी वाहन असा एकुण किं. 85,000/–रू चा माल आरोपींचे ताब्यातुन जप्त करून पुढील कायदेशीर कार्यवाही करीता नमुद दोन्ही आरोपी हे जप्त मुद्देमालासह पोलीस स्टेशन रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन रामटेक करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, सपोनि राजीव कर्मलवार,पोहवा नाना राउत, पोना दिनेश आधापुरे, राजेंद्र रेवतकर, सत्यशील कोठारे, पोशि विपीन गायधने, रोहन डाखोरे, अमोल वाघ, चालक अमोल कुथे व आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर